SL. No. : X

ಒಟ್ಟು ಪ್ರಶೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 50 ]
Total No. of Questions : 50 ]

**CCE RF**
**CCE RR**

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 8
[ Total No. of Printed Pages : 8

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M** **Code No. : 08-M**

# ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ
# Subject : First Language — MARATHI

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ / New Syllabus )**

**( ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ + ಪುನರಾವರ್ತಿತ ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Regular Fresh + Regular Repeater )**

ದಿನಾಂಕ : 30. 03. 2017 ] [ Date : 30. 03. 2017

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 09-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ–12-30 ರವರೆಗೆ ] [ Time : 09-30 A.M. to 12-30 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100 ] [ Max. Marks : 100

**विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तूनिष्ठ प्रकारचे 50 प्रश्न आहेत.

2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.

3. बहूपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नांसाठी दिलेल्या सुचनांचे पालन करा.

4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.

5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

येथून कापा

TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER
प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा

Tear here

## विभाग - A

### ( गद्य पद्यांशावर आधारित )

I. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा : $11 \times 1 = 11$

1. अनंत शक्तीः परमेश्वरू या पाठाचे मूल्य काय ?
2. केसोबास ( केशिराज बास ) कोणत्या शतकात होऊन गेले ?
3. स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रीमंडळात डॉ॰ आंबेडकर कोणते मंत्री होते ?
4. वाटणीचा घोळ किती महिण्यापासून सुरु होता ?
5. उत्तम कांबळेच्या आईने थळोबास कोणता नवस केला ?
6. 'लमाण' हे आत्मचरित्र कोणी लिहिले आहे ?
7. गंगूबाईना शारदंबेचे वस्त्र कोणी दिले ?
8. गंगूबाईनी मरणोत्तर कोणता संकल्प केला ?
9. 'विवेकसिंधू' हा ग्रंथ कोणी लिहिला ?
10. विदर्भदेशाच्या राजाचे नाव काय ?
11. लोकगीत म्हणजे काय ?

II. खालील प्रश्नांची उत्तरे **तीन-चार** वाक्यात लिहा : $6 \times 2 = 12$

12. 'विद्या हे शस्त्र आहे' असे आंबेडकर का म्हणतात ?

13. ''आम्ही तुम्हाला कामावर ठेवलयं की तुम्ही आम्हाला'' संदर्भासह स्पष्ट करा.

14. वाटणीच्या घोळाने कोणती परिस्थिती निर्माण झाली ?

15. संत ज्ञानेश्वरांचा परिचय द्या.

16. पाहुणे कवितेच्या आधारे पाहुण्याचे स्वभावदोष सांगा.

17. 'सुन्या तिच्याही दाहीदिशा' मधील स्त्रीला कोणता विसावा कशासाठी हवा आहे ?

III. खालील प्रश्नांची उत्तरे **पाच-सहा** वाक्यात लिहा : $8 \times 3 = 24$

18. वसईचा किल्ला केंव्हा ताब्यात घेतला ? बालपरवेशी व नाना परवेशी म्हणजे काय ?

19. 'शेकडा नव्वद टक्के गोष्टी आपण दुस-यासाठी करतो' असे काणेकर का म्हणतात ?

20. 'मदर्स युनियन' बद्दल माहिती द्या.

21. गावात प्रवेश केल्यावर केशव मेश्रामना कोणते दृश्य दिसले ?

22. ढोंगी साधूचे वागणे कसे असते ?

23. कृष्ण, सौभद्र, कर्ण यांचे दाखले स्पष्ट करा.

24. पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून कोणी कोणी कशी याचना केली आहे ?

25. धरण बांधणा-या स्त्रीची व्यथा तुमच्या शब्दात लिहा.

IV. खालील प्रश्नांची उत्तरे **आठ-दहा** वाक्यात लिहा : $5 \times 4 = 20$

26. 'हिरवे सांगाती' पाठातील बहावा, बांबू, चाफा व पपया या झाडा विषयी माहिती सांगा.

27. सावित्रीबाईना शाळेत शिकवत असताना कोणत्या अडचणी आल्या ?

28. तुकडोजीना भारत कसा अपेक्षित आहे ?

29. शेतात राबणा-या शेतक-याचे, त्याच्या पत्नीचे व मुलाचे वर्णन करा.

30. पुढील कवितेच्या ओळी पूर्ण करा —

कवच ....................................................

.............................................................

.............................................................

.................................................. सत्कार.

**विभाग - B**

**( व्याकरणावर आधारित )**

V. खालील पर्यायातून योग्य उत्तर निवडून लिहा : $10 \times 1 = 10$

31. 'दिङ्मूढ' ही संधी अशी सोडवितात

(अ) दिग + मूढ (ब) दिङ् + मूढ

(क) दिक् + मूढ (ड) दिगं + मूढ.

32. प्रथमा विभक्तीचे प्रत्यय हे आहेत

(अ) ने, शी, इ (ब) प्रत्यय नाहीत

(क) नो (ड) त, ई, आ.

33. 'रियाने गीत गायिले' या वाक्यात हा प्रयोग आहे

(अ) कर्तरी (ब) कर्मणी

(क) भावे (ड) यापैकी नाही.

34. 'सर्वेश शाळेला जात आहे.' या वाक्यातील काळ हा आहे

(अ) रीती वर्तमान काळ (ब) साधा भूतकाळ

(क) अपूर्ण वर्तमान काळ (ड) पूर्ण वर्तमान काळ.

35. 'पदरी पडले असे झाले.' असेच्या ठिकाणचा शब्द

(अ) काळे (ब) चांगले

(क) सोने (ड) पवित्र.

36. 'विद्यार्थ्यानी अभ्यास करावा.' हे या प्रकारचे वाक्य आहे

(अ) केवल वाक्य (ब) आज्ञार्थी वाक्य

(क) संयुक्त वाक्य (ड) मिश्र वाक्य.

37. 'पालापाचोळा' हा या प्रकारचा समास आहे

(अ) वैकल्पिक द्वंद्व (ब) इतरेतर द्वंद्व

(क) समाहार द्वंद्व (ड) द्विगू.

38. 'माशासारखे डोळे असणारी' याला एक शब्द हा आहे

(अ) मीनाक्षी (ब) सुनयनी

(क) मृग नयनी (ड) सुलोचनी.

39. 'केदार आणि रिया वेगात धावले' यातील 'वेगात' या शब्दाची जात ही आहे.

(अ) शब्दयोगी अव्यय (ब) क्रिया विशेषण

(क) विशेषण (ड) क्रियापद.

40. 'उंट' याचे स्त्रिलिंगी रूप हे आहे

(अ) उंटी (ब) उंटीण

(क) मांडणी (ड) सांडणी.

VI. खालील दोन पदातील संबंध ओळखून तिस-या पदाशी जुळणारा शब्द लिहा : 4 × 1 = 4

41. गरीब : श्रीमंत : : उषा : ..............

42. • : पूर्ण विराम : : : ..............

43. सिंहाचा : छावा : : वाघाचा : ..............

44. ऑफिस : इंग्रजी : : तूप : ..............

VII. सूचने प्रमाणे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा : 3 × 2 = 6

45. 'पाहून मम उदासी, चाफा हसून बोले' अलंकार ओळखून लक्षण सांगा.

46. 'विद्या बंधु असे विदेश गमनी विद्या महादेवता.'

वरील ओळीचे गण पाडून वृत्त ओळखा.

47. पुढील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :

i) डोक्यावर घेणे —

ii) कोंडमारा होणे —

## विभाग - C

### ( लेखन व रचनेवर आधारित )

VIII. 48. खालील पैकी **एका** कल्पनेचा विस्तार करा : 1 × 3 = 3

(i) तनू त्यागिता कीर्ति मागे उरावी.

(ii) पेरिले ते उगविते, बोलण्या सारखे उत्तर येते.

IX. 49. शिक्षणाचे महत्व सांगणारे पत्र मित्राला/मैत्रिणीला लिहा. 5

**किंवा**

शाळेच्या स्नेह संमेलनाला व पालकसभेला हजर येणे बद्दल आईला / वडिलाना पत्र लिहा.

X. 50. खालील पैकी एका विषयावर **15** ते **20** ओळीत निबंध लिहा : 1 × 5 = 5

(i) संगणक-काळाची गरज.

(ii) भारताला भेडसावणा-या समस्या.

(iii) शेतक-याच्या देशात शेतक-याचाच बळी.